## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१४२४/२०२२/नंदुरबार**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. खलिल रज्जाक खाटिक, रा. नवभारत हौसिंग सोसायटी, मु.पो. ता. नवापुर, जि. नंदुरबार - ४२५४१८ | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय, शासकीय दुध योजना इमारत,जूने जिल्हाधिकारी कार्यालय, साक्री रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार | उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय, शासकीय दुध योजना इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय, साक्री रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार |

**सुनावणी दिनांक — १३/१२/२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| . अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०३/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी चुकीचे शासन परिपत्रक देवून दिशाभूल केली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून चुकीचे व दिशाभूल करणारे आदेश पारित केले.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती व दंड करावा. माहिती मिळवून द्यावी.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २०/०९/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २०/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ०१/०१/२०१९ ते आज दिनांक पर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१) नवापूर व गव्हाली सिमा तपासनी नाक्यावर होत असलेले भ्रष्टाचार बाबत अनेक लोक प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ता तसेच सामान्य नागरीकांनी आपल्याकडे तक्रार व निवेदन दाखल केले आहे एकून आलेले तक्रार अर्जाची व निवेदनाची आपल्या मार्फत केलेली कार्यवाहीची या सर्व कागदपत्रांची छायांकित प्रती देण्यात यावे.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार यांनी दि.०४/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण — २०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दिनांक १४/१०/२०१९ नुसार वैयक्तीक गाऱ्हाणासंबंधीचे अर्ज ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला असेल त्याच्याकडून स्विकारण्यात यावेत. एजंटांकडून किंवा त्यांच्यामार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची सामान्यत: दखल घेण्यात येवू नये, असे सर्व मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांना सुचीत करण्यात आले आहे, असे नमूद करुन सदर परिपत्रकाची प्रत अपीलार्थीस पुरविल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २९/११/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २९/११/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : चुकीचे उत्तर दिले आहे.

**४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार यांनी २३/१२/२०२१ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अपीलार्थी यांना जा.क्र. १११९/म.मा.अ/उपप्रापका/नंदु/२०२१ दिनांक ०४/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र७१/१८ (र.व.का.) दिनांक १४ ऑक्टोंबर २०१९ चे परिपत्रकानुसार जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रत उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (ज) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असल्याने प्रथम अपील निकाली काढण्यात आले, असे आदेश दि.२९/१२/२०२१ रोजी पारित करण्यात आल्याचे दिसून येते.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी - जन माहिती अधिकारी यांनी दि.०४/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण – २०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दिनांक १४/१०/२०१९ नुसार वैयक्तीक गाऱ्हाणासंबंधीचे अर्ज ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला असेल त्याच्याकडून स्विकारण्यात यावेत. एजंटांकडून किंवा त्यांच्यामार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची सामान्यत: दखल घेण्यात येवू नये, असे सर्व मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांना सुचीत करण्यात आले आहे, नमूद करुन सदर परिपत्रकाची प्रत अपीलार्थीस पुरविल्याचे दिसून येते.

**६. निष्कर्ष –**

१) जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४/१०/२०२१ च्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिल्याचे दिसून येते.
२) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२३/१२/२०२१ रोजी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून दिसून येते.
३) अपीलार्थी सुनावणीस अनुपस्थित असल्याचे कोणती माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिली याचा बोध होऊ शकला नाही.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक.१४२४/२०२२/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग)

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ४३८६ दिनांक :- 03 JUN 2025